आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
९ जानेवारी २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराला वेग, राजकीय पक्षांकडून एआयसह डिजिटल माध्यमांचा वापर

- परळी नगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि MIM सत्तेत एकत्र आल्याचा अंबादास दानवे यांचा दावा, शिवसेनेकडून खंडण

- दशावतारसह एकूण ४ चित्रपट ऑस्करच्या सर्वसाधारण श्रेणीसाठी पात्र, कांतारासह ५ चित्रपट उत्कृष्ट चित्रपटांच्या यादीत

**आणि**

- क्वालालांपूर इथं सुरू असलेल्या मलेशिया ओपन सुपर 1000 बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पी. व्ही. सिंधुची धडक

**<><><><><>**

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराला आता वेग आला आहे. उमेदवार तसंच सर्व पक्षांचे नेते मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी डिजिटलं उपकरणं, तंत्रज्ञानासह विविध माध्यमांचा उपयोग करत आहेत. पदयात्रा, रॅली आणि सभा या पारंपरिक पद्धतींसह निवडणूक प्रचारात आता कृत्रिम बुद्धिमत्तेचाही समावेश झाला आहे. पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रचार करण्यासाठी भाजपाने एआयचा वापर करून केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजना मतदारापर्यंत पोहोचवण्याची मोहीम सुरू केली आहे. तर काँग्रेस पक्षही समाजमाध्यमाद्वारे मतदारांशी डिजिटल संपर्क साधत आहे. विविध समाजमाध्यम व्यासपीठांचा वापर करत चित्रफीत, रिल आणि मेसेजद्वारे काँग्रेसचे उमेदवार प्रचार करत आहेत.

**<><><><><>**

राजकारणातील वैचारिक बांधिलकी कमी होत असून बहुतांश राजकीय पक्षांनी त्यांची मूळ विचारधारा बाजूला ठेवली आहे, असं मत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत व्यक्त केलं. पक्षाचे समर्थक वाढवण्यासाठी

राजकीय पक्ष  विविध मार्ग अवलंबत असल्याबद्दल पवार यांनी चिंता व्यक्त केली. सध्या देशात, राज्यात ज्या काही राजकीय घडामोडी घडत आहे, त्या पार्श्वभूमीवर विविध पक्षाच्या नेत्यांना प्रलोभन देत, त्यांच्यावर दबाव टाकून पक्षांतर करण्यास भाग पाडलं जात आहे. त्यामुळे आजच्या काळात पक्षांतर ही सामान्य गोष्ट झाली असल्याचं मत उपमुख्यमंत्री पवार यांनी व्यक्त केलं.

**<><><><><>**

परळी नगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि MIM या पक्षांनी एकत्र येऊन सत्ता स्थापन केली असल्याचा दावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी केला आहे. मात्र शिवसेना नेते संजय शिरसाठ यांनी हा आरोप फेटाळून लावला आहे. शिवसेनाच MIM ला हद्दपार करेल. त्यामुळं त्यांनी अधिक माहिती घ्यावी, असा सल्ला शिरसाठ यांनी दानवे यांना दिला.

या नगरपालिकेत एकूण ३५ जागा आहेत. त्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे १६, शिवसेनेचे २ आणि MIM चा एक नगरसेवक यांनी एकत्र येऊन गट स्थापन केला आहे. तर भाजपाचे ७ आणि २ अपक्ष वेगळ्या गटात आहेत. याशिवाय काँग्रेसचा १ आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे २ नगरसेवकांनी वेगळा गट स्थापन केला आहे.

**<><><><><>**

बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकीत पक्षाचे आदेश न मानणाऱ्या मुंबईच्या २६ भाजप कार्यकर्त्यांना ६ वर्षांसाठी पक्षातून निलंबित करण्यात आलं आहे. भाजपाचे मुंबई अध्यक्ष अमित साटम यांनी या संदर्भात अधिकृत पत्रक जारी केलं आहे. वारंवार समज देऊनही महायुतीच्या उमेदवाराला सहकार्य न केल्यामुळे या कार्यकर्त्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

**<><><><><>**

आगामी महानगरपालिकांच्या निवडणुकीपूर्वी भारतीय जनता पक्षाचा बॅनर जाळल्याच्या आरोपावरून ठाणे पोलिसांनी अदखलपात्र गुन्हा दाखल केला आहे. उल्हासनगर इथे ही घटना घडली असून या घटनेचा तपास सुरू आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

**<><><><><>**

ग्रामीण भागात रोजगाराची हमी देणारी विकसित भारत जी राम जी योजना केंद्र सरकारतर्फे राबवण्यात येत आहे. या योजनेविषयी रत्नागिरी जिल्ह्यातल्या खेडशी गावचे सरपंच वसंत बंडबे यांनी आकाशवाणीकडे प्रतिक्रिया दिली.

**- - होल्ड बाईट (२० सेकंद) - - -**

- <><><><><>

ठाण्यात घोडबंदर इथं रस्त्यावर सांडलेल्या तेलावरून कंटेनर घसरून झालेल्या अपघातात चार जण गंभीर जखमी झाले आहेत. आज सकाळी दहाच्या सुमारास झालेल्या या अपघातात ११ वाहनांचं नुकसान झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. या अपघातामुळे घोडबंदर गायमुख मार्गावरील वाहतूक सुमारे दोन तासांहून अधिक काळ ठप्प होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ठाण्याच्या दिशेने सिमेंट घेऊन येणारा कंटेनर रस्त्यावर सांडलेल्या तेलावरून घसरला आणि दुभाजकावरून दुसऱ्या मार्गिकेत घुसला. चालकाचं कंटेनवरलं नियंत्रण सुटल्यामुळे तो समोरून येणाऱ्या वाहनांना धडकला. या अपघातानंतर कंटेनर चालक फरार झाला.

**<><><><><>**

गोंदिया जिल्ह्याच्या तिरोडा तालुक्यातल्या खडकी गावात आज बिबट्याच्या हल्ल्यात एका चार वर्षाच्या मुलाचा मृत्यू झाला. बिबट्यानं आज सकाळी मुलावर हल्ला करत त्याला घरातून फरपटत नेलं. गावकऱ्यांनी आरडाओरडा करत बिबट्याचा पाठलाग केल्यावर मुलाला अर्ध्या वाटेत सोडून बिबट्या पसार झाला. मात्र, तोपर्यंत मुलाचा मृत्यू झाला.

**<><><><><>**

देशभरात आज प्रवासी भारतीय दिवस साजरा केला जात आहे. ज्यामध्ये भारताच्या विकासात आणि अर्थव्यवस्थेत मोलाची भूमिका बजावणाऱ्या अनिवासी भारतीयांचा सन्मान केला जातो. नऊ जानेवारी १९१५ मध्ये महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेतून भारतात परतले होते, या घटनेचं स्मरण म्हणून हा दिवस साजरा केला जातो. भारतीय संस्कृतीचा प्रसार आणि जागतिक स्तरावर देशाचा प्रभाव वाढवण्यात प्रवासी भारतीयांचं योगदान यानिमित्त अधोरेखित केलं जातं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी प्रवासी भारतीय दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

नवी दिल्लीतल्या न्यायालयानं कथित जमीन घोटाळाप्रकरणी राष्ट्रीय जनता दलाचे प्रमुख आणि माजी रेल्वेमंत्री लालू प्रसाद यादव यांच्यासह त्यांचं कुटुंब आणि इतरांविरोधात आरोप निश्चित करण्याचे आदेश आज दिले. याप्रकरणी २३ जानेवारीपर्यंत आरोप निश्चित करावेत, असं न्यायालयानं सांगितलं.

रेल्वेमंत्री असताना लालूप्रसाद यादव यांनी पदाचा गैरवापर करून नोकऱ्यांच्या बदल्यात जमीन मिळवल्याचा आरोप विशेष न्यायाधीश विशाल गोगणे यांनी मान्य केला. सीबीआयनं लालूप्रसाद यादव, राबडी देवी, तेजस्वी यादव यांच्यासह इतरांविरोधात आरोपपत्र दाखल केलं आहे. दरम्यान, हे आरोप राजकीय हेतूने करण्यात आल्याचा बचाव आरोपींनी केला आहे.

<><><><><>

कांतारा - द लिजंट चॅप्टर १, तन्वी द ग्रेट, महावतार नरसिम्हा, टुरिस्ट फॅमिली, आणि सिस्टर मिडनाइट हे ५ भारतीय चित्रपट ऑस्करच्या उत्कृष्ट चित्रपट श्रेणीसाठी पात्र ठरले आहेत. अकादमी ऑफ मोशन पिक्चरने आज ही घोषणा केली. याशिवाय दशावतार, महामंत्रा, पेपर फ्लॉवर, पारो हे ४ चित्रपट सर्वसाधारण श्रेणीसाठी पात्र आहेत. एकूण ३१७ चित्रपट ९८ व्या ऑस्कर पुरस्करांसाठी पात्र ठरले आहेत. त्यातल्या २०१ चित्रपटांकडे उत्कृष्ट चित्रपट श्रेणीसाठीची अतिरीक्त पात्रता असल्याचं अकादमीनं जाहीर केलं. या सर्व चित्रपटांमधून ऑस्करसाठी नामांकित झालेल्या चित्रपटांची यादी २२ जानेवारी जाहीर होईल. याशिवाय भारताकडून आंतरराष्ट्रीय चित्रपट श्रेणीसाठी होमबाऊंड या चित्रपटाचं नामांकन करण्यात आलं आहे.

<><><><><>

बीड जिल्ह्यात आष्टी, पाटोदा आणि शिरूर विधानसभा मतदारसंघात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी, मजूर आणि सामान्य नागरिकांचं प्रचंड नुकसान झालं असूनही शासनाकडून ठोस मदत मिळत नसल्याच्या निषेधार्थ आष्टी तहसील कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात आलं. हे आंदोलन माजी आमदार भीमराव धोंडे आणि माजी आमदार बाळासाहेब आजबे यांच्या नेतृत्वाखाली झालं. विविध गावांतले शेतकरी, युवक, महिला, सामाजिक कार्यकर्ते आणि पदाधिकारी यात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**<><><><><>**

रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत हिंगोली उपप्रादेशिक परिवहन कार्यालयानं आयोजित केलेल्या वाहन चालक नेत्र तपासणी शिबिराला चांगला प्रतिसाद मिळाला. वाहन चालकांनी या शिबिराचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला.

दरम्यान, दुचाकी किंवा चारचाकी वाहनांवर प्रखर प्रकाशाचे पांढरे एलईडी दिवे बसवणाऱ्या चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचं उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल गावडे यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

इंडियन कोर्सर अर्थात भारतीय धाविक हा दुर्मीळ पक्षी भंडारा जिल्ह्यात आढळून आला आहे. भंडारा तालुक्यातल्या कोरंभी इथल्या वैनगंगा नदीच्या खोऱ्यात हा पक्षी वन्य छायाचित्रकार केशव कुंभलकर यांना आढळून आला आहे.

**<><><><><>**

भारताची आघाडीची बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू हिनं क्वालालांपूर इथं सुरू असलेल्या मलेशिया ओपन सुपर 1000 स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक मारली. आज सिंधूची लढत जपानच्या अकाने यामुगची हिच्याशी झाली. सामना सुरू झाल्यानंतर सिंधूने पहिला गेम २१–११ असा जिंकला. त्यानंतर यामागुची हिला दुखापत झाल्यानं तिनं सामना सोडला. यामुळे सिंधू स्पर्धेच्या उपांत्य फेरीत दाखल झाली. पाच वर्षांनंतर सिंधू प्रथमच या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत दाखल झाली आहे.

दरम्यान, या स्पर्धेच्या पुरुष दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत भारताचे बॅडमिंटनपटू सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांची लढत इंडोनेशियाच्या जोडीशी भारतीय प्रमाणवेळेनुसार ३ वाजून २० मिनिटांनी सुरू होणार आहे.

**<><><><><>**

डब्ल्यूपीएल अर्थात महिला क्रिकेट प्रीमियर लीगच्या चौथ्या हंगामाला आजपासून सुरुवात होत आहे. सलामीचा सामना विद्यमान विजेता मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात होणार आहे.

**//<><><><><>//**